महासागर

शनिवार १४ जून २०२५

भंडारा

पान ६

# ग्राहक मेळाव्यात ३० लाखाचे कर्ज वितरित ; बँक ऑफ इंडियाचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा ,दि. १३जून:** बँक ऑफ इंडिया शाखा सिहोराच्या वतीने काल १२ जून रोज गुरुवारला ग्रामपंचायत कार्यालय सिहोरा येथे बँक ग्राहक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात उपस्थित महिलांना बँकेचे शाखा व्यवस्थापक रोहित वानखेडे यांनी योग्य मार्गदर्शन करून बँकेचे कर्ज व विमा अशा अनेक योजनेची माहिती देऊन महिला बचत समूहांना ३० लाख रुपये कर्जाची राशी धनादेशाद्वारे वितरित करण्यात आली.

यावेळी ग्रामपंचायत सिहोराचे सरपंच सौ. रंजुताई तुरकर, उपसरपंच सलामभाई शेख व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी बँक ऑफ इंडिया शाखा सिहोच्या बँक सखी सौ. रेखा पटले, उमेद



अभियानच्या स्थानिक प्रमुख, सदस्य व बचत गटाच्या समूहाने अथक परिश्रम घेतले.

# पेयजल योजना तत्काळ पूर्ण करा

## भंडारा व पवनी न.प. आढावा बैठकीत आम. भोंडेकर यांचे निर्देश

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** भंडारा विधानसभा क्षेत्रा अंतर्गतच्या भंडारा आणि पवनी या दोन्ही नगर परिषद अंतर्गत सुरू असलेल्या विकास कामांसह शहरातील समस्यांचा आढावा आज आ. नरेंद्र भोंडेकर यांनी घेतला. दोन्ही ठकणी झालेल्या आढावा बैठकीत माजी नगर सेवकांनी आपल्या समस्या मांडल्या ज्यावर आ . भोंडेकर यांनी तत्काळ कार्यवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. विशेष म्हणजे शहरातील पेयजल योजनेची उर्वरित पाईप लाईन लवकरात लवकर टाकून व त्या योजनेच्या टांकी ला जोडून पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या कंत्राटदार व अधिकाऱ्यास देण्यात आले.

भंडारा व पवनी नगर परिषद अंतर्गत आम. नरेंद्र भोंडेकर यांच्या प्रयत्नाने आनण्यात आलेल्या विविध योजनेची विकास कामे सुरू असून गेल्या काही काळात या कामांची गती संथ झाल्याचे आ . भोंडेकर यांच्या लक्ष्यात आले.

या करीता आज आम. नरेंद्र भोंडेकर यांनी तडका फडकी दोन्ही नगर परिषदेत आढावा बैठक घेण्याचे ठरविले आणि ज्या करीता दुपारी १२ वाजता भंडारा नगर परिषद आणि सायंकाळी ४.३० वाजता पवनी नगर परिषदेत बैठक घेण्यात अली.

या बैठकीत समस्त माजी नगर सेवक यांनी उपस्थित राहून त्यांच्या प्रभागात सुरू कामांमध्ये येत असलेल्या अडचणी आम. भोंडेकर यांच्या समक्ष मांडल्या. ज्यात सर्वात महत्वचे म्हणजे पेयजल योजनेचे काम संथ गती ने सुरू असून पाईप लाईन टाकून झाल्यावरही पाणी मिळत नसल्याचे सांगण्यात आले. ज्यावर आ . नरेंद्र भोंडेकर यांनी संबंधित विभाच्या अधिकारी आणि ठेकेदारस खडसावून सांगितले की ज्या क्षेत्रात पाईप लाईन टाकण्यात अली नाही तेथे पाईप टाकून पाणी पुरवठा सुरळीत करावे. अन्यथा ठेकेदारवर दंडात्मक कार्यवाई करण्याचे निर्देश आम. भोंडेकर यांनी नगर परिषद च्या मुख्य अधिकाऱ्यांना दिले. या व्यतिरिक्त अतिक्रमण धारकांचे पट्टे वाटप, घरकुल योजना व त्यांची मंजूरी, शहरातील आरोग्य व स्वच्छता सह सांडपाण्याच्या योजने संदर्भात ही चर्चा करून आम. भोंडेकर यांनी अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश दिले.

***२६ जून ला प्रायोगिक तत्वावर सुरू होणार वायफाय***

भंडारा नगर परिषद क्षेत्रांतर्गत आ . नरेंद्र भोंडेकर यांनी वायफायच्या माध्यमातून इंटरनेट सेवा देण्याचे वचन दिले होते. ते वचन पूर्ण होत असून भंडारा नगर



परिषद अंतर्गत १२ ठिकाणी वायफायच्या सेवेची कामे पूर्ण झाली आहे आणि येत्या २६ जून म्हणजे आम. नरेंद्र भोंडेकर यांच्या जन्मदिन निमित्त याची प्रायोगिक तत्वावर एक महिन्या करीत सुरुवात करण्यात येणार आहे. या दरम्यान येणाऱ्या आदि अडचणी दूर करून ही सेवा सुरळीत करण्यात येईल.

# सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** जिल्ह्यातील समस्याग्रस्त आणि पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी प्रभावी व्यासपीठ मिळावे, त्यांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण मिळावे आणि न्यायप्राप्ती सुलभ व्हावी, यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन साजरा करण्यात येतो.

या अनुषंगाने सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे दुपारी १.०० ते २.०० या वेळेत तक्रारी स्वीकृतीसाठी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तक्रार अर्ज सादर करण्यासाठी आवश्यक नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, पहिला माळा, जिल्हा मजूर सहकारी संघ, साईनाथ नगर, मातोश्री हॉस्पिटल समोर, नागपूर नाका, भंडारा येथे उपलब्ध आहे.

**तक्रार दाखल करताना पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे:**

जिल्हाधिकाऱ्यांना उद्देशून अर्ज तालुका महिला लोकशाही दिनाचे टोकन क्रमांकाचा प्रत तहसीलदाराच्या उत्तरांची प्रत (प्रकरण थेट जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित असल्यास टोकन क्रमांकाची गरज नाही)

तक्रार अर्ज हे न्यायप्रविष्ट प्रकरणे, सेवा व आस्थापना विषयक किंवा वैयक्तिक नसावेत. अशा स्वरूपाच्या तक्रारी स्वीकृत केल्या जाणार नाहीत. अधिक माहिती आणि मार्गदर्शनासाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सदस्य सचिव, जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समिती तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, भंडारा यांनी केले आहे.

# मॉर्निंग वॉक ग्रुप सानगडी द्वारा विमान दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली



**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी ,दि. १३जून:** दिनांक १२ जूनला अहमदाबाद मधून लंडन गेटविकला जाणारा विमान १७१ कोसळल्याने त्यात देश विदेशातील अनेक नागरिक मृत्युमुखी पावले.

विमान दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या सर्वांना मॉर्निंग वॉक ग्रुप सानगडी द्वारा श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी श्रीपत राऊत गुरुजी, मोरा नागरिकर माजी सरपंच सासरा, श्रीरंगजी खोब्रागडे उपसरपंच सासरा, धनराज पोवनकर, माधवराव झिंगरे, सुधीर मांडवटकर, गणेश झिंगरे, जयदेव गोंधळे, हीरेश रुखमोडे, पुरुषोत्तम बारस्कर इत्यादी द्वारे दुःखद दिवस म्हणून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# १४ ला भंडारा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** अखिल विश्व गायत्री परिवार, युवा प्रकोष्ठ भंडारा, महाराष्ट्र सकल धोबी समाज आरक्षण न्यायिक समिती भंडारा, नंदगोपाल फाऊंडेशन व जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी, इंडियन रेड क्रॉस सोसायटी भंडारा यांच्या संयुक्त विद्यमानाने शनिवार दि.१४ जून २०२५ सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत गायत्री शक्तीपीठ, समता नगर, मेंढा रोड भंडारा येथे जागतिक रक्तदान दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत रक्तपेढ्यांमध्ये नेहमीच रक्ताचा तुटवडा जाणवत असतो. त्यात मागणी जास्त आणि पुरवठा कमी अशी परिस्थिती निर्माण होत असते. परिणामी अपघातग्रस्त, गरोदरमाता, शस्त्रक्रियेतील रुग्ण यांच्यासाठी रक्त उपलब्ध करण्यात अनेक अडचणी निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील जास्तीत-जास्त तरूण, जागृत नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जोपासत समाजासाठी पुढाकार घेऊन रक्तदान करावे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून त्यामुळे एखाद्याचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे समाजाचे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने पुढे येऊन या कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन अखिल विश्व गायत्री परिवार, युवा प्रकोष्ठचे चेतन भैरम, सौरभ दिवटे, महाराष्ट्र सकल धोबी समाज आरक्षण न्यायिक समितीचे जिल्हाध्यक्ष विलास केजरकर, नंदगोपाल फाऊंडेशनचे संस्थापक उपाध्यक्ष डॉ. यशवंत लांजेवार, रेडक्रॉस चे जिल्हा कोषाध्यक्ष डॉ. हेमंत चंदवासकर यांनी केले आहे.

# भळं - अनेक औषधी गुणधर्म औषधी झाडे नामशेष होण्याच्या मार्गावर

**शाहेद कुरेशी**

**साकोली ,दि. १२जून:** बेकायदेशीरपणे झाडे तोडल्यामुळे जंगलातील औषधी झाडे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जांभळा सारख्या औषधी झाडांची संख्या बरीच कमी झाल्याचे दिसून येत आहे. मोठी फळे देणाऱ्या जांभळाच्या झाडांची संख्या नगण्य आहे. तथापि, लहान फळे देणारी काही जांभळाची झाडे अजूनही शिल्लक आहेत. एक काळ असा होता की जांभळाची झाडे गावकऱ्यांसाठी उत्पन्नाचे साधन होती. दरवर्षी गावकरी जांभळाची विक्री करून आर्थिक फायदा मिळवत असत. आजकाल मोठ्या शहरांमध्ये जांभळाची मोठी फळे १०० ते १५० रुपये प्रति किलो दराने विकली जात आहेत, परंतु झाडांची संख्या कमी असल्याने मागणी पूर्ण होत नाही.



काही वर्षांपूर्वीपर्यंत, या भागातील शहरांमध्ये जांभळाचा चांगला पुरवठा होता. व्यापारी जांभळ खरेदी करण्यासाठी गावांमध्ये येत असत. येथून येणारे जांभळ इतर शहरांमध्येही पाठवले जात असे. गावकरी म्हणतात की आता मोठ्या आकाराचे फळ उत्पादकही गावांमध्ये विकले जात आहेत.

***ब्लॅकबेरीचे औषधी गुणधर्म***

काबीहायड्रेट्स, फायबर, प्रथिने, जीवनसत्त्वे, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम, सोडियम. जांभळाच्या झाडांची संख्या बरीच कमी झाली आहे. जर हीच परिस्थिती राहिली तर जंगलातून जांभळाचे झाड नामशेष होईल. जांभळात अनेक औषधी गुणधर्म आहेत.

जांभळ अनेक रोगांशी लढते आणि आपले रक्षण करते. जांभळात ॲस्ट्रिंजंट गुणधर्म आढळतात, जे आपल्या अनेक आजारांवर उपचार करतात. जांभळात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट, अँटी- इफेक्टिव्ह आणि अँटी-मलेरिया गुणधर्म आढळतात, जे आपल्या आरोग्यासाठी खूप उपयुक्त आहेत.

# किसान ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षपदी विजय नवखरे यांचे निवड



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. १३जून:** शेतकऱ्यांसाठी लढणारे किसान ब्रिगेड संघटना चे पुढारी प्रकाश पोहरे यांनी जिल्हा अध्यक्ष म्हणून विजय नवखरे यांची निवड केली.

विजय नवखरे यांनी सांगीतले की, आपण जिल्हात शेतकऱ्यांचं प्रश्न सोडविण्याकरिता आंदोलन करू, शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत सरकार गांभीर्याने त्यांच्याकडे लक्ष देत नाही आपण किसान ब्रिगेड संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न करू.

त्यांच्या नियुतीबद्दल डी जी रंगारी, राजेश भदाडे, सचिन दूरकर, चरण मेंनपाले, भुमेश्वर नवखरे, जितेन्द्र श्यामकुवर, प्रशांत श्यामकूवर, वैभव राघावते, सखाराम मेनपाले, संतोष पुराम, संदिप श्यांकुवर, संजय नवखरे, सुमंत मेंनपाले, नाना भदाडे, श्रीकांत भोवते, अशोक मेंनपाले व इतर कार्यकर्त्यांना अभिनंदन केले.

# माती परीक्षणानुसार खताचे व्यवस्थापन करावे : शास्त्रज्ञ डॉ . मनोजकुमार पुनिया

**दामिनी, मेघदूत अँप चा वापर करा - शास्त्रज्ञ डॉ. मनोजकुमार पुनिया यांचे शेतकऱ्यांना आवाहन*

**किन्ही (मोखे) येथे विकसित कृषी संकल्प अभियान*

**वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सन्मानित , सरपंच घनश्याम पारधी यांनी केले कृषी रथाचे स्वागत*



**महासागर प्रतिनिधी**

**किन्ही /मोखे ,दि. १३जून:** शेतकऱ्यांनी शेतीत पिके घेण्या अगोदर माती परीक्षण आवश्यक असते माती परीक्षण करून माती परीक्षण अहवालानुसार खतांचे व्यवस्थापन करावे. बदलत्या हवामानात शेतीला टिकाव मिळण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे शेतकऱ्यांना काळची गरज आहे. शेतकऱ्यांनी दामिनी, मेघदूत मोबाईल अँपचा वापर करून हवामानाची माहिती वेळेवर मिळवून आपत्ती व्यवस्थापन करावे. शेतकऱ्यांनी स्वतः चे, पिकांचे, प्राण्यांचे व आर्थिक नुकसान टाळावे. असे आवाहन आयसीएआर, सी आय आर सीओटी मुंबई चे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ मनोजकुमार पुनिया यांनी केले. ते किन्ही मोखे येथील विकसित कृषी संकल्प अभियान सभेत बोलत होते.

विकसित कृषी संकल्प अभियान या कार्यक्रमाचे आयोजन गुरूवार दि. १२ जून ला जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा किन्ही (मोखे ) चे प्रांगणात आयोजित करण्यात आले होते. सदर अभियान अंतर्गत कार्यक्रमात शास्त्रज्ञ डॉ पुनिया बोलत होते.

या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्र साकोली व अकोला यांनी केले होते. कार्यक्रमाला राज्य सरकारकडून पुरस्कृत शेतीनिष्ठ शेतकरी, माजी पं.स. सदस्य, कर्तव्यदक्ष गाव कारभारी, लोकसेवक सरपंच घनश्यामभाऊ पारधी, आयसीएआर मुंबई चे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ मनोजकुमार पुनिया, कृषी अधिकारी विलास गोविंद पात्रीकर , कृषी विस्तार अधिकारी एस. व्ही. भटकर , कृषी विस्तार अधिकारी ए.पी.ब्राम्हणकर, कृषी अभियांत्रिकी के.व्ही.के. चे विषय विशेषज्ञ योगेश महल्ले, पशुसंवर्धन के.व्ही.के.चे विषय विशेषज्ञ डॉ. प्रवीण खिरारी, अजय राऊत उपसंचालक आत्मा , विर्शीचे कृषी सहायक डि.बी.भोंडे, किन्ही च्या कृषी सहायक कु. कुंदा परशुरामकर , म.गां. तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष भाऊराव राऊत, माजी सरपंच बाबुलाल गणवीर, से. नि. मुख्याध्यापक युवराज कापगते, खेमराज नंदेश्वर, कामराज कापगते, विलास बोरकर, अशोक कापगते, विश्वदीप साखरे, होमराज वलथरे नकटू कागदे, शुभम राऊत , आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये कृषी संकल्प अभियान याविषयी व त्याच्या उद्दिष्ट विषयी माहिती देणार देण्यात आली. तसेच उपस्थित कृषी अधिकारी विलास पत्रिकर यांनी कृषी विषयक योजनांची माहिती दिली. कृषी विस्तार अधिकारी भटकर यांनी आपल्या विभागात मार्फत असलेल्या विविध योजनांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. मुंबई चे वरीष्ठ वैज्ञानिक डॉ .मनोज कुमार पुनिया यांनी उपस्थित शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व, व विविध खरीप पिकातील आधुनिक तंत्रज्ञानाची शास्त्रीय माहिती देऊन, शेतकऱ्यांनी आपला आर्थिक विकास साधावा असे आवाहन केले तसेच विषय विशेषज्ञ डॉ योगेश महल्ले यांनी धान पिकातील वापरण्यात येणारी आधुनिक यंत्रसामग्री या विषयी माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमादरम्यान चर्चासत्रात शेतकऱ्यांनी आपले अनुभव व अडचणी मांडल्या कृषी विभागाच्या तज्ञांनी त्यांचे निरसन करून समजून घेतल्या. कृषी विज्ञान केंद्र साकोली तर्फे आलेल्या कृषी रथाचे अवलोकन व खरिप हंगामातील पिके योजनांची माहिती शेतकऱ्यांनी जाणून घेतली. या संकल्प अभियान अंतर्गत कार्यक्रमाला शेतकरी बांधव भगिनी , शेतकरी गट व ग्रामस्थांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. यात महिला शेतकऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता कृषी विषयाशी संलग्नित सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन कृषी सहायक कु. कुंदा परशुरामकर यांनी तर आभारप्रदर्शन येथील गाव कारभारी, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सन्मानित सरपंच, लोकसेवक घनश्यामभाऊ पारधी यांनी केले.

# निराधार वयोवृद्धावर केले अंत्यसंस्कार

## रवी परशुरामकर मित्रपरिवार ने दिला मानवतेच्या संदेश...



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. १३जून:** जन सेवा हीच ईश्वर सेवा याचा प्रत्यय देत सेंदूरवाफा साकोली येथील माजी नगरसेवक रवि परशुरामकर व मित्रपरिवाराने मानवतेचा परिचय दाखवत प्रभाग क्र. २ मधील एका अत्यंत निराधार वयोवृद्धावर त्याच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठी सर्वप्रकारची मदत केली. गेल्या कित्येक वर्षापासून मागे पुढे कोणीच नसल्याने सेंदूरवाफा येथील लक्ष्मी नारायण हायस्कूल जवळील एका झोपडीवजा घरात एकाकी जीवन जगत असलेले हेमंत तुकाराम शेंडे (७०) या वयोवृद्ध व्यक्तीचे दि. १२ जून २०२५ रोजी पहाटे १ वाजता दरम्यान निराधार अवस्थेत निधन झाले. पहाटे ५ वाजता कोणालाही वेळेवर मदतीसाठी सदैव तत्पर असलेले प्रभागाचे माजी नगरसेवक तथा जिल्हा भाजपा सचिव रवि परशुरामकर यांना हेमंत शेंडे यांच्या मृत्यूची फोनवरून बातमी कळली. क्षणाचाही विलंब न लावता रवि परशुरामकर धावून गेले. एवढ्यात वार्डातील जवळची मंडळी जमली होती. सर्वांनी मिळून तयारी सुरू केली. वर्गणी गोळा केली. एक हात मदतीचा या हेतूने तयारी सुरू केली व अंत्य संस्काराची पूर्ण तयारी केली आणि स. ११ वाजता दरम्यान उमरी कपूरी नदी घाटावर अंत्यविधीची संपूर्ण प्रक्रिया पार पाडली. यावेळी रवि परशुरामकर यांच्या सोबत विजयकुमार चांदेवार, विकास कापगते, आनंदराव मांढरे, शांताराम परतेकी, दिगंबर कापगते, मधूकर काशिवार, महादेव डोंगरवार, संजू हटवार, ज्ञानेश्वर राकडे, अंताराम मेश्राम, बाबुराव सूर्यवंशी, ज्ञानेश्वर कापगते, नील प्रकाश राऊत, बबलू चांदेवार, अरुण गायकवाड, गेदलाल शेंडे, सतीश केवट, सुनील काशीवार आर्दीनी सहकार्य केले.

# फेसकॉम, कार्यक्रमाची सूचना

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** भंडारा जिल्हा जेष्ठ नागरिक मंडल भंडारा संलग्न महाराष्ट्र जेष्ठ नागरीक महासंघ फेसकॉम मूंबई जिल्हा शाखा भंडाराचे वतीने दि.१५जून २०२५रोजी सकाळी १०.०० वाजता मंडळाचे कार्यालय हूतात्मा स्मारक विरंगुळा केंद्र भंडारा येथे, जेष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस , साजरा करण्यात येणार आहे.

करिता मंडळाचे पदाधिकारी व सर्व सभाषद यांनी मंडळाचे कार्यालयात खालील स्थळी व वेळी, वेळेवर उपस्थित राहावे. ही विनंती. श्री. जाधवराव साठवणे अध्यक्ष भंडारा जिल्हा जेष्ट नागरिक फेसकॉम मंडळ भंडारा तथा अशासकीय सदस्य जिल्हा जेष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती भंडारा यांनी केले आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801

महासागर भंडारा

**मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

## कृषी विभागातर्फे तक्रार निवारण कक्ष कार्यरत

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा :** जिल्ह्यामध्ये कृषी निविष्ठावर नियंत्रण ठेवण्यासाठी सन २०२५ २६ मध्ये जिल्हा स्तरावर एक व तालुक्यामध्ये एक याप्रमाणे एकूण आठ भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे .

तसेच जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे जिल्ह्याचा तक्रार निवारण कक्षाचा भ्रमणध्वनी क्रमांक ९४ २३ २८ ३७२ असा आहे.

सन २०२४ -२५ मध्ये रासायनिक खतांचे पाच परवाने रद्द करण्यात आले. दोन केंद्रांचे निलंबन करण्यात आले.

तर पाच कीटकनाशक परवाने रद्द करण्यात आले. बियाणेंचे सहा परवाने रद्द आणि निलंबन चार करण्यात आल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

# शेतकरी वैतागला, शेती देत आहेत ठेक्याने

### *बी -बियाणे, खते, कीटकनाशके महागले *ट्रॅक्टर मशागतीचे भाव गगनात

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी , दि. १३ जून:** शेती उत्पादनासाठी दिवसेंदिवस वाढता खर्च, त्यातच पावसाचे बिघडलेले गणित आणि शेतमालाला मिळणारा कमजोर भाव यामुळे शेती हा व्यवसाय नेहमी हानिकारक ठरत आहे. परिणामी हवालदिल शेतकरी आता ठेक्याने शेत देण्यास प्राधान्य देत आहेत. ज्यांना शेती शिवाय पर्याय नाही आणि घरचे चारही जीव शेतीत राबु शकतात असे शेतकरी शेती ठेक्याने घेऊन परंपरागत व्यवसायावर गुजारन करण्याचा प्रयत्न करतात.

कृषीप्रधान समजल्या जाणाऱ्या भारत देशात शेतकरी मात्र पराधीन झाले आहे. शेती हा व्यवसाय सट्टा, जुव्वा यासारख्या बिनभरवशाचा व्यवसाय बनला आहे.

जिल्ह्यात तलावांची संख्या खूप जास्त असली तरी सिंचनाच्या बाबतीत अजूनही काही क्षेत्र माघारलेलेच आहेत.

जास्तीत जास्त शेती कोरडवाहू असल्यामुळे शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागते. बहुतांश शेतकऱ्यांना दरवर्षी सहकारी सोसायटी, बँक, अथवा सावकारांकडून कर्ज काढून शेती व्यवसाय करावा लागतो, दरवर्षी ३१ मार्च पर्यंत कर्जाची परतफेड करणाच्या अटीवर शासन शेतकऱ्यांना बिनव्याजाचे कर्ज देत असते. मात्र शेतीतील लागवडीचा खर्च आणि उत्पादनातून येणारी रक्कम याचा गणित केल्यास अखेर शेती तोट्यातच येत असल्याने परिणामी अनेक शेतकरी कर्जाचे मुद्दल भरू शकत नाही. एकदाचे कर्ज थकले की ते दरवर्षी शेतकऱ्यांच्या डोक्यावर ओझे बनूनच राहत असते. एकंदरीत विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत शेती करणे म्हणजे जुगार खेळल्यासारखे झाले आहे.

शेतीसाठी आवश्यक बैलजोडीच्या किमतीतही वाढ झाली आहे. त्यात ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरनी व ईतर कामे कामे करण्यात येत असल्याने खर्चात दिवसेंदिवस वाढ होत आहे. शेतीत राबणाऱ्या मजुरांचीही टंचाई होत असून मजुरीतही फार वाढ झाली आहे. त्यामुळे मजुरांचे भावही आवक्याबाहेर गेले आहे. या सर्व कारणांमुळे आता सामान्य शेतकरी शेती करू शकत नसल्याने शेती ठेक्याने देने हे योग्य समजत आहे.

***'कोण करतो ठेक्याने शेती '***

ज्याचे कुटुंब शेती या व्यवसायावर अवलंबून असतात. आणि घरातील सर्व लोक शेती व्यवसाय करत असतील, त्यात स्वतःचे ट्रॅक्टर आणि शेतीसाठी २४ तास वेळ देण्याची क्षमता असेल असे लोक शेतकऱ्यांकडून शेती ठेक्याने घेण्यास समोर येत असतात.

सिंचनाची सोय पाहून शेतीचे वार्षिक किंवा तिमाही दर ठरविले जाते. कधीकाळी ठेके करणाऱ्या शेतकऱ्यांनी सुद्धा मालाच्या अल्पभावामुळे ठेके सुद्धा सोडले आहे.

***' कृषी केंद्राकडून शेतकऱ्यांची लुबाडणूक '***

बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, तन नाशके यांच्या किमती शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणाऱ्या ठरत आहेत. शेतकऱ्यांची नाड बघून कृषी केंद्राचे मालक शेतकऱ्यांना लुबाडून त्यांना कंगाल करण्याच्या बेतात असल्याचेही कित्येकदा शेतकऱ्यांनी अनुभवले आहे.

वर्षभर राबराब राबूनही वर्षाअखेर खर्च वजा जाता शेतकऱ्यांच्या हाती नफा शिल्लकच राहत नाही. त्यामुळे शेती ठेक्याने देऊन एकर कमी पैसा मिळवण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला आहे.

# नाल्या तुंबल्याने आरोग्य आले धोक्यात

### *रोहणा येथील प्रकार *गावात दुर्गंधी



**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी :** तालुक्यातील रोहणा येथील सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्या तुंबल्याने सांडपाणी रस्त्यावर येऊन गावभर दुर्गंध पसरत आहे. गावातील वार्ड क्र. २ मधील वसाहतीत गेल्या काही वर्षांपासून नाल्यातील गाळाचा उपसा करण्यात आलेला नाही. त्यामुळे सांडपाणी वाहून जाण्याचा अडथळा निर्माण होत आहे. याशिवाय माती व केरकचऱ्याने नाल्या पूर्णतः गाळाने तुंबल्या आहेत. त्यामुळे डासांची पैदास मोठ्या प्रमाणात वाढत आहे. स्वच्छतेसाठी ग्रामपंचायतला मिळणारा विशेष निधी जातो कुठे? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. रोहणा येथील वार्ड क्र. २ मध्ये नाल्यातील गाळाचा उपसा वर्षभर होत नसल्याने नाल्यामध्ये मातीचे थर, प्लास्टिकच्या पिशव्या, केरकचरा मोठ्या प्रमाणात साचला आहे. नाल्या पूर्णपणे तुंबून भरलेल्या आहेत. या परिसरातील नागरिकांच्या घराजवळ नाल्या फुटल्याने सांडपाण्याचे मोठे डबके तयार झाले आहेत. येथील गाळ उपसा करण्याकडे ग्रामपंचायत प्रशासन अक्षरशः दुर्लक्ष करीत आहे. वर्षभर नालीसफाई करण्याकडे दुर्लक्ष केल्याने बुजलेल्या नाल्यांमध्ये माती कचऱ्यांचे थर जमा होऊन खराब सांडपाणी जागेवरच थांबून दुर्गंधी पसरत आहे. सध्या स्थितीत नाल्यांची अवस्था बिकट स्वरूपाची झाली आहे. गाळाच्या उपस्या अभावी सांडपाणी एकाच ठिकाणी जमा होऊन डास, किळे व जंतू तयार होत आहेत. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

गावातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून ग्रामपंचायतीचा स्वच्छतेवर भर नाही तर गलिच्छे वर भर दिसत आहे. पाणीकर, घरकर भरण्यासाठी ज्या पद्धतीने ग्रामपंचायत कडून शक्तीचे नियम लावले जातात मग नाल्या उपसा करण्यासाठी सक्तीचे नियम का लावले जात नाही? एखाद्या नागरिकांनी वेळेवर घरकर न भरल्यास त्याच्या घरातील साहित्य ग्राम पंचायत कडून जप्ती केले जातात. तर मग आता सांडपाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्याचे काय? असे अनेक प्रश्न गावकरी विचारत आहेत. विशेष म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीला नागरिकांच्या घरात अंगणात पाणी शिरते. हीच स्थिती कित्येक वर्ष उद्भवली आहे. तरीसुद्धा ग्रामपंचायत जागी होत नाही . लोकांचे आरोग्य बिघडण्यापूर्वी ग्रामपंचायतीने त्वरित गाळ उपसा करून साफसफाई करावी. आणि फूटलेल्या नाल्यांची दुरुस्ती करावी अशी मागणी वार्ड क्र. २ मधील आणि गावातील संपूर्ण नागरिक करीत आहे.

***'ग्रामपंचायतची जबाबदारी काय '***

गावात सर्वच वार्डात नाल्या बनल्या आहेत. परंतु एकही नाली व्यवस्थित नाही. सर्व नाल्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. आता उन्हाळ्याचे दिवस असतानाही नाल्या तुंबून भरल्या आहेत. काही ठिकाणी नाल्या ओव्हरफ्लोव झाल्याने सांडपाणी रस्त्यावर येत आहे.

तरीपण ग्रामपंचायत याकडे लक्ष देत नाही. नाली लगत असलेल्या नागरिकांच्या घरी कोणतेही कार्यक्रम असल्यास ते स्वतः नाली साफ करतात. जर नागरिक स्वतः नागरिक नाल्या साफ करत असतील तर मग ग्रामपंचायतिची जबाबदारी काय?

***' दुर्गंधी व डासामुळे नागरिक हैराण '***

रोहणा ग्रामपंचायत प्रशासन गावातील नागरिकांकडून पाणीकर, गृहकर न चुकता दरवर्षी वसूल करत असते. पण गावातील स्वच्छतेवर काहीही लक्ष देत नाहीत. गावातील सांडपाण्याचा निचरा योग्य त्या पद्धतीने होत नसल्याने नाल्यात डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होत आहे. संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. या प्रकारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर ही दखल घ्यावी.

# भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा जिल्हा अधिवेशन संपन्न

### कॉम्रेड हिवराज उके यांची पुन्हा जिल्हा सचिव पदी निवड

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास आपल्या सदस्यांसोबतच सर्वांना माहीत झाला पाहिजे. या देशाचा पहिला विरोधी पक्ष भारतीय कम्युनिस्ट पक्ष होता. आधी स्वातंत्र्यासाठी आणि नंतर सत्तेची पदे नाकारून अन्नसुरक्षा कायदा, वनाधिकार कायदा, शेती व घरकुल धारकांना पट्टे, आवाज योजना, निराधार योजना, रोजगाराचा कायदा, माहिती अधिकाराच्या कायदा इत्यादी जनकल्याणासाठी आणि जनविरोधी धोरणाविरुद्ध आपला संघर्ष सुरू आहे. प्रस्थापितांचा संविधान मनुस्मृती आहे तर आमचा भारतीय संविधान आहे आणि आम्हाला या देशात भारतीय घटनेवर निष्ठा व ईमान ठेवून मार्क्सवादी-लेनिनवादी तत्त्वज्ञानाच्या आधारावर लोकशाही व धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांवर आधारित समाजवादी व्यवस्था कायम करायची आहे यासाठी पक्ष मजबूत करावा लागेल असे प्रतिपादन अधिवेशनाचे प्रमुख मार्गदर्शक कॉम्रेड शाम काळे यांनी केले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा दोन दिवशीय भंडारा जिल्हा अधिवेशन दिनांक ८व९ जून २०२५ ला प्राचार्य कॉम्रेड शिवदास उटाणे नगर, नव प्रेरणा विणकर सभागृह मोहाडी येथे कॉम्रेड माधवराव बांते, कॉम्रेड गजानन पाचे व कॉम्रेड सुनंदा रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य कॉम्रेड हौसलाल रहांगडाले यांनी उद्घाटन केले तर राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉम्रेड शिवकुमार गणवीर, राज्य सचिव मंडळ सदस्य व महाराष्ट्र आयटकचे सरचिटणीस कॉम्रेड श्याम काळे, जिल्हा सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड सदानंद इलमे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. जिल्हा सचिव कॉम्रेड हिवराज उके यांनी मागील तीन वर्षाचा पक्षाचा कार्यात्मक व संघटनात्मक अहवाल व यापुढे करावयाच्या कार्याचा लिखित अहवाल उपस्थित प्रतिनिधींच्या चर्चेसाठी सादर केला. त्यावर प्रतिनिधींनी आपले मनोगत सादर केले.

दिनांक ८ जूनला अधिवेशनाची सुरुवात कॉम्रेड विमल शिवदास उटाणे मोहाडी या ज्येष्ठ कॉम्रेडच्या हस्ते पक्षाच्या ध्वजारोहणाने करण्यात आली तर ९ जून ला जिल्हा सचिवाने चर्चेला उत्तर दिल्यानंतर कॉम्रेड माधवराव बांते यांच्या अध्यक्षीय भाषणाने समारोप करण्यात आले. तत्पूर्वी राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉम्रेड शिवकुमार गणवीर यांनी मार्गदर्शन करताना पक्षाचे ध्येयधोरण व यापुढे जनतेच्या ज्वलंत प्रश्नासाठी व न्याय हक्कासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना व पक्ष, संघटनांना दडपून टाकण्यासाठी राज्य सरकारने आणलेल्या जन विरोधी व संविधान विरोधी जन सुरक्षा विधेयकाच्या व स्मार्ट व प्रीपेड मीटरच्या विरोधात तीव्र संघर्षाचे आवाहन केले.

या अधिवेशनात पुढील तीन वर्षासाठी निवर्तमान जिल्हा सचिव कॉ. हिवराज उके यांची पुन्हा भाकपचे भंडारा जिल्हा सचिव म्हणून सर्व संमतीने निवड करण्यात आली. तर कॉ. शैलेंद्र गणवीर व कॉ. अनिल गाढवे, जिल्हा सहसचिव तर कॉ. गजानन पाचे यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच २९ सदस्यीय जिल्हा कौन्सिल व ९ सदस्यीय जिल्हा सचिव मंडळाची पण निवड करण्यात आली. तसेच याच जिल्हा अधिवेशनात दिनांक २२ ते २४ जूनला नाशिक येथे होणा?्या पक्षाच्या राज्य अधिवेशनाच्या प्रतिनिधींची देखील निवड करण्यात आली.

जिल्हा सचिव का. हिवराज उके यांनी सर्व प्रकारची निवड भाकपच्या संविधानानुसार व लोकशाही मध्यवर्तीत्वाच्या आधारावर झाल्याची घोषणा केली. त्यानंतर मोहाडी तालुका सचिव कॉम्रेड अनिल गाढवे यांनी आभार मानले आणि शेवटी कम्युनिस्ट इंटरनॅशनल गीताने जिल्हा अधिवेशनाची सांगता झाली.

# तक्षशिला महिला मंडळाचे 'त्या' जागेवर ध्वजारोहण

### रमाई बालोद्यान व समाज मंदिर होणार ; साकोली गणेश वार्ड येथील प्रकरण



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि. १३जून:** शहरातील गणेश वार्ड तलाव बायपास कडेला येथील तक्षशिला महिला मंडळाची १२ वर्षांपासून समाज मंदिर व रमाई बालोद्यानसाठी राखिव असलेल्या शासकीय जागेवर अज्ञात व्यक्तीने अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने माती आणून टाकली. पण या नियोजित जागेवर कुणाचेही अतिक्रमण खपवून घेणार नाही तर येथे ०३ जूनला महिला मंडळाच्या सदस्यांनी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करीत या रमाई बालोद्यान जागेवर सामुहिक वंदना घेण्यात आली. सविस्तर की, गणेश वार्ड तलाव बायपास मार्गावर १२ वर्षांपासून शासकीय जागेत समाजमंदिराची मागणी आहे. कारण झेंडा चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बुद्ध पौर्णिमा, महापरिनिर्वाण दिन, संविधान दिवस साजरा केला जातो. पण रोडवर जागेअभावी कार्यक्रम होऊ शकत नाही. करीता या शासकीय जागेवर समाजमंदिर व रमाई बालोद्यान करीता नुकतेच ०२ जूनला आ. नाना पटोले यांचेकडे महिलांनी निवेदन सादर केले आहे. कारण ही जागा १२ वर्षांपासून 'तक्षशिला महिला मंडळ' ची राखिव व नियोजित जागा असून चार दिवसांपूर्वी कुणी अज्ञात व्यक्तीने अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने त्या जागेवर माती आणून टाकली. म्हणून परीसरातील सुमारे ४० महिला घटनास्थळी पोहोचले आणि त्यांच्या जागेवर धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करून सामुदायिक वंदना घेण्यात आली. आणि महिलांनी इशारा दिला आहे की, अज्ञात व्यक्तींकडून येथे आमच्या समाजमंदिर जागेवर माती टाकली ती हटविण्यात यावी. अन्यथा महिलांकडून तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

तक्षशिला महिला मंडळाच्या नियोजित जागेवर ध्वजारोहण आणि वंदना प्रसंगी मंडळातील विद्या शहारे, शिला रंगारी, प्रेमलता बडोले, संगिता रंगारी, सरूबाई राऊत, रजीया भैसारे, आशा थुलकर, पोर्णिमा साखरे, उमा राऊत, मालता रंगारी, प्रमिला रंगारी, सुनंदा कोटांगले, पुष्पा गजभिये, उषा रंगारी, दिव्या भैसारे, मनिषा भैसारे, प्रभा थुलकर, ममता मेश्राम, अर्चना रंगारी, जया मेश्राम, सत्यभामा मेश्राम, ग्यानीबाई वासनिक, लिला बंबार्डे, स्नेहल बंबार्डे, लता टेंभूर्णे, सपना राऊत, ज्योत्स्ना गजभिये, नंदा हुमणे, नम्रता राऊत यांसह सर्व महिला पुरुष उपस्थित झाले होते.

# सनफ्लॅग कंपनीतर्फे विश्व पर्यावरण सप्ताहाचा उत्साहात समारोप

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** सनफ्लॅग आर्यन अँड स्टील कंपनी (वरठी) तर्फे विश्व पर्यावरण सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम आणि उपक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले आणि यशस्वीरीत्या समारोप करण्यात आला.

५ जून रोजी विश्व पर्यावरण दिनानिमित्त शीशमहल गेट येथे सकाळी कंपनी कुटुंबातील मुलींनी ङप्लास्टिकमुक्त पर्यावरणङ या थीमवर आधारित आकर्षक व संदेशपर रंगोली साकारली. संध्याकाळी ५ वाजता कंपनीच्या आवारात पोलिस अधीक्षक श्री. नूरुल हसन यांच्या हस्ते मियावाकी (सघनवन) प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे ९ हजार विविध प्रजातींची झाडं लावण्यात आली.

९ जून रोजी बीड गावच्या मोक्षधाम येथे सनफ्लॅग व ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने मियावाकी सघनवन व प्लास्टिकमुक्त पर्यावरण दिनाचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये सुमारे ३०० झाडं लावण्यात आली.

१० जून रोजी कंपनी कॉलनीच्या स्मृतिवन येथील जडीबुटी उद्यानात विविध औषधी वनस्पतींची लागवड पतंजली योग समिती, सनफ्लॅग कंपनी आणि गायत्री परिवार तर्फे करण्यात आली.

यामध्ये कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, गार्डन विभाग, कॉलनीतील महिला, सुरक्षा रक्षक, विद्यार्थी, युनियन पदाधिकारी आदींनी सक्रिय सहभाग घेतला.

११ जून रोजी समारोप कार्यक्रम ऑडिटोरियम हॉलमध्ये पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. राजेंद्र जाधव, कंपनीचे संचालक श्री. रामचंद्र दलवी, सीईओ श्री. बी. के. तिवारी, एचआर हेड श्री. सतीश श्रीवास्तव, गायत्री परिवाराचे सह समन्वयक श्री. राजीव शक्करवार, डी.एल. शुक्ला, मोरेश्वर तिडके, ग्रीन हेरिटेज फाउंडेशनचे मोहम्मद सईद शेख, सनफ्लॅगचे समीर पटेल, कार्तिकेश व्यास, जवाहरलाल गुप्ता, सुजीत भोयर, शाळेचे प्राचार्य सुमित पांडे, कामगार युनियनचे मिलिंद वासनिक, रविंद्र बोरकर, विकास बातें, विकास फुके, नेमा, इरशाद शेख, योगेश मस्के, शैलेश श्राद्धेय इत्यादी उपस्थित होते.

प्रारंभी पाहुण्यांचे वृक्ष रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र जाधव, श्री. रामचंद्र दलवी व श्री. बी. के. तिवारी यांनी उपस्थितांना योग्य मार्गदर्शन केले. सनफ्लॅग शाळेच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणावरील नुक्कड नाट्य व गीत सादर केले तसेच मोहगाव देवी हनुमान व्यायाम शाळेच्या वंदना भांडारकर, मुकेश साठवने व त्यांच्या टीमने सादर केलेले नुक्कड नाट्य सर्वांनी प्रशंसेने पाहिले. या आठवड्यात विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता. विजेत्या विद्यार्थ्यांना व टीमला पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजीत भोयर यांनी केले व आभार प्रदर्शन कार्तिकेश व्यास यांनी केले. या पर्यावरण सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी कंपनीच्या सर्व विभागांचे, पदाधिकाऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे, कार्यकर्त्यांचे, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, कॉलनीतील महिला, नर्सरी वर्कर्स तसेच गायत्री परिवार, पतंजली योग समिती, ग्रीन हेरिटेज फाउंडेशन भंडारा, वन विभाग, पोलीस विभाग, सुरक्षा रक्षक व नर्सरी टीम यांचे मोलाचे योगदान लाभले.



# विज ग्राहकांना मनस्ताप: चोर पावलांनी विद्युत मिटर बदलविण्यांचे काम जोरात

### *पोलीसात तक्रार करणार म्हणताच पळाले *कोणत्याही ओळखपत्रा शिवाय मिटर बदलवितात

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत शासनानाने नियुक्त केलेल्या कंपनी च्या भाडोत्री ,अज्ञानी तथा गुंड प्रवृत्तिच्या लोकाद्वारा कोणत्याही प्रकारची माहिती किंवा पुर्व सुचना न देता, जुने चालू अवस्थेत असलेले मीटर बदलून स्मार्ट प्रिपेड रिचार्ज मीटर लावून ग्राहकांच्या भोळेपणाचा व सुजान नागरीकांना धाक दाखवून शक्तीने मीटर बसविले जात असल्याचा आरोप समाजसेवक व मानवाधिकार आयोग संगठन चे कार्यकर्ता समतानगर फेज२ निवासी प्रा.डॉ.बबन मेश्राम यांनी संबंधित विभाग व प्रशासन यांना पाठविलेल्या निवेदनात केला आहे.

विज कायदा २००३ मिल अधिनियम क्र.४७ (५)नुसार मिटर वापरा संबंधित स्वातंत्र्य आणि कायदेशीर निवड करण्यांच्या अधिकार ग्राहक हक्काला बगल देवून मिस्टर लावण्यांचा गैरप्रकार खुले आम सुरु आहे.याकडे जनप्रतिनिधि, संबंधित विभाग, शासन-प्रशासन डोळे झाक करीत आहे.

ग्राहकांचे हक्काचे संरक्षण करने विज वितरण कंपनी चे मुलभुत कर्तव्य असतांना कुंपणच जर शेत खात असेंल तर न्यायाची अपेक्षा ग्राहकांनी कुणाकडून करायची असा प्रश्न डॉ.मेश्राम यांनी केला.

मिटर बदलवून देणारे कंत्राटी कामगार तसेच स्वयंघोषित इंजिनियर यांचे जवळ कोणत्याही प्रकारचे अधिकृत ओळखपत्र सुध्दा नाही. तसेच विद्युत वितरण कंपनी चे अधिकृत कर्मचारी सुध्दा नसतात, चालू विद्युत वाहणीवरुन मीटर बसविले जात असल्याने जिवीताला धोका झाल्यास जवाबदेही कोण असा ही प्रश्न निर्माण होतो. यामुळे विज ग्राहक व जनता संभ्रमित अवस्थेत असून निराशाजनक भितीच्या वातावरणात आर्थिक संकटात सापडलेली आहे.

पोलिसाचे संरक्षण आम्हाला आहे असे मुजोरीने सांगणारे पोलिस यांना बोलावतो म्हणताच निघून गेल्याने विविध प्रश्न निर्माण झाले असून पोलिस विभागने सुध्दा दक्ष असावे असे ही निवेदन केले आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात ३ जुलै २०२४ रोजी ग्वाही दिली होती की सर्वसामान्य ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर लावण्यात येणार नाहीत. पण तरीही भंडारा शहराती व महाराष्ट्रात इतरत्र खाजगी कंपन्या स्मार्ट मीटर लावत आहेत.

प्रीपेड स्मार्ट मीटर योजनेमुळे हजारो कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नोकरीला धोका आहे. त्याचबरोबर सामान्य वीज उपभोक्त्यांना प्रीपेड स्मार्ट मीटर योजनेमुळे खूपच नुकसान सोसावे लागेल. गुजरात, बिहार, मध्य प्रदेश, जम्मू काश्मीर, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी प्रीपेड स्मार्ट मीटरला कर्मचारी आणि वीज उपभोक्त्यांचा कडाडून विरोध होत आहे.परंतू भंडारा शहरातील सामान्य जनता व जनप्रतिनिधि कमालीचे झोपेचे सोंग घेत असल्याने चिंतन करणारी बाब आहे.

***प्रीपेड मीटर रद्दची घोषणा; मात्र ४ कंपन्यांचे २७,००० कोटींचे टेंडर कायम***

नागरिकांचा प्रचंड विरोध यामुळे स्मार्ट प्रीपेड मीटर बसवणार नसल्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी एका कार्यक्रमात बोलताना नागरिकांच्या घरी नाही, तर केवळ सरकारी कार्यालयांमध्ये हे मीटर बसवणार असल्याचे सांगितले. विधिमंडळातही याबाबत त्यांनी घोषणाच केली. मात्र, अदानींसह चार कंपन्यांना दिलेल्या २.२५ कोटी मीटरच्या ६ निविदा अद्याप रद्द केलेल्या नाहीत. या निविदा तब्बल २७,००० कोटींच्या आहेत. विशेष म्हणजे प्रीपेड मीटरबाबत महावितरणला आतापर्यंत कोणतेही आदेश अधिकृतपणे मिळालेले नाहीत.

राज्यात स्मार्ट मीटर बसवण्यासाठी ६ निविदा काढण्यात आलेल्या होत्या. यातील १.१६ कोटी मीटरचे सर्वात मोठे कंत्राट अदानींना मिळालेले आहे.

नागार्जुन कन्स्ट्रक्शन कंपनीला (एनसीसी) ५७ लाख मीटरच्या २ निविदा, मॉंटे कार्ली कंपनीला ३०.३० लाख मीटरचे १ टेंडर आणि जीनस कंपनीची २१.७६ लाख मीटरची १ निविदा अंतिम झालेली आहे. महावितरण कंपनीने काढलेल्या टेंडर्सना ७ ऑगस्ट २०२३ रोजीच मंजुरी मिळाली असून त्यानुसार संबंधित पुरवठादारांना मंजुरीपत्रही देण्यात आले आहे.

***३ कंपन्यांना मीटर बनवण्याचा अनुभव नसतानाही कंत्राट***

अदानी, नागार्जुन कन्स्ट्रक्शन (एनसीसी), मॉंटे कार्ली व जीनस कंपन्यांना प्रीपेड मीटरची ६ कंत्राट मिळालेली आहेत.

यापैकी फक्त जीनस कंपनी मीटर उत्पादक आहे. वीजेच्या प्रीपेड मीटरसाठी परिमंडळ निहाय अंतिम झालेल्या निविदा व कंपन्यांचे काम अजूनही सुरूच आहे, सरकारने आधी निविदा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा.



डॉ. बबन मेश्राम

नागरिकांच्या घरात स्मार्ट मीटर लागणार नाही, अशी घोषणा शासनाने केली. पण या मीटरसाठी दिलेले कंत्राट रद्द झालेले नसून संबंधित कंपन्यांचे कामही सुरू आहे. सरकारने कंपन्यांना दिलेल्या निविदा रद्द कराव्यात. अशी मागणी असतांना सुध्दा प्रशासनाची मुजोरी सुरुच असल्याने यास आवर कोण घालणार अशी चिंता डॉ.बबन मेश्राम यानी केली आहे.

***..तर अडीच कोटी मीटर भंगारात***

राज्यात सर्वच घरांमध्ये स्मार्ट मीटर बसवल्यास आज वापरात व स्टॉकमध्ये असलेले सुमारे ३.५ कोटी मीटर भंगारात टाकणार का, त्याचा खर्च कुठून वसूल करणार, असा प्रश्न उपस्थित केला आहे.

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने 'नॅशनल स्मार्ट ग्रीड मिशन' योजनेअंतर्गत देशभर स्मार्ट मीटर, प्रीपेड मीटर बसवण्याचा कार्यक्रम ऑगस्ट २०२१ मध्ये जाहीर केला.

***देशात मार्च २०२५ अखेरपर्यंत २२.२३ कोटी मीटर लावण्याचे उद्दिष्ट आहे.***

सर्वसामान्यांच्या घरांमध्ये स्मार्ट मीटर बसवण्यात येणार नाही, यासंदर्भात प्रशासने सांगितले आहे. असे असतांना आपण मिटर का बदलविता अशी विद्युत ग्राहकाने मागणी केली असता, कंपन्यांच्या करारबद्दल माहिती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास नाही किंवा मिटर बदलविणारे कंत्राटी जवळ नाही, हे नवलच आहे. स्मार्ट मीटर्समुळे वीजचोरी रोखली जाईल, अशी जाहिरात कंपनीने 'एक्स' समाज माध्यमावरून केली होती. मात्र, यामुळे केवळ बिलिंग व वीज वापर मोजणी अचूक होऊ शकेल. मीटरमध्ये छेडछाड व वीजचोरीला आळा घालणे यामुळे कसे साधणार, हे अद्याप स्पष्ट नाही. तेव्हा सजग नागरीकांनी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटने तर्फे स्मार्ट प्रिपेंड मीटर अमान्य -नमुना अर्ज म.रा., विद्युत वितरण कंपनीला देवून विरोध दर्शवा अशी आर्त हांक मानवाधिकार आयोग संगठन (दिल्ली)चे कार्यकर्ता समतानगर फेज२ निवासी डॉ.बबन मेश्राम यांनी केली आहे.

# डिजीलॉकरमध्ये विजेची बिले उपलब्ध

### लाभ घेण्याचे महावितरणचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. १३जून:** आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला अशी महत्त्वाची कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात सुरक्षित ठेऊन हवे तेव्हा उपलब्ध करून देणाऱ्या केंद्र सरकारच्या डिजिलॉकर या ऑनलाईन सुविधेमध्ये आता महावितरणची वीजबिलेही उपलब्ध झाली असून वीज ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून वीज ग्राहकांना ईज ऑफ लिव्हिंगच्या आधारे अधिकाधिक सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने केंद्र सरकारच्या डिजिलॉकरशी वीजबिले जोडली आहेत. यामुळे वीज ग्राहकांना आपल्या मोबाईल फोनमध्ये डिजिलॉकर अँपमध्ये ठेवलेल्या महत्त्वाच्या दाखल्यांसोबतच वीजेची बिलेही उपलब्ध होणार आहेत.

त्यांना वीजबिल भरण्यासाठी तसेच गरजेनुसार हे बिल कोणाला पाठविण्यासाठी किंवा त्याचा प्रिंट काढण्यासाठी याचा उपयोग होईल.

डिजिलॉकर हा केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या अंतर्गत सुरू केलेला महत्त्वाचा उपक्रम आहे. त्याचा वापर करून नागरिकांना आपले पॅन कार्ड, वाहन नोंदणी कागदपत्रे, रेशन कार्ड, दहावी मार्कशीट, बारावी मार्कशीट, निवासाचा दाखला असे अनेक दस्तऐवज अँपमध्ये सुरक्षित ठेवता येतात आणि गरजेनुसार त्यांचा वापर करता येतो. सर्व दाखले मोबाईलच्या ॲपमध्ये ठेवलेले असल्याने ते सदैव सोबत उपलब्ध राहतात. देशात आतापर्यंत ५२ कोटी ८९ लाख नागरिकांनी डिजिलॉकरचा वापर सुरू केला असून त्यांनी त्यात ८५९ कोटी कागदपत्रे ठेवली आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या नियमावलीनुसार डिजिलॉकरमधील दस्तऐवज मूळ कागदी प्रत्यक्ष दाखल्याच्या समान समजले जातात व त्याला कायदेशीर दर्जा आहे. महावितरणने आपल्या संगणकीय व्यवस्थेतील बिलांची माहिती डिजिलॉकर सुविधेला उपलब्ध करून दिली आहे. वीज ग्राहकाने आपल्या डिजिलॉकर अँपमध्ये गेल्यानंतर महावितरण वीज कंपनीची निवड करून आपला वीज ग्राहक क्रमांक दाखल करण्याची कृती एकदाच करायची आहे. त्यानंतर त्या ग्राहकाला आपल्या डिजिलॉकरमध्ये विजेचे चालू महिन्याचे बिल उपलब्ध होईल.

